भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

# परिसीमन अधिनियम, २००२

**(२००२ चा अधिनियम क्रमांक ३३)**

[१७ एप्रिल, २००६ रोजी यथाविद्यमान]

# The Delimitation Act, 2002

**(Act No. 33 of 2002)**

[*As in force on the 17th April, 2006*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

**[किंमत :** रुपये १०.००**]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १७ एप्रिल, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि डिलीमिटेशन ॲक्ट, २००२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक १, दिनांक १ जून, २००६ यात पृष्ठे २० ते २४ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १ जून, २००६.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Delimitation Act, 2002 as on the 17th April, 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 15, dated 1st June, 2006 on pages 20 to 24.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date, 1st June, 2006.

T. K. VISWANATHAN,
Secretary to the Government of India.

# परिसीमन अधिनियम, २००२

## कलमांचा क्रम

**कलमे**

१. संक्षिप्त नांव.
२. व्याख्या.
३. परिसीमन आयोगाची घटना.
४. आयोगाची कर्तव्ये.
५. सहयोगी सदस्य.
६. नैमित्तिक रिक्त पदे.
७. आयोगाची कार्यपद्धती व अधिकार.
८. जागांच्या संख्येचे पुन:समायोजन.
९. मतदारसंघाचे परिसीमन.
१०. आदेश प्रसिद्ध करणे आणि त्यांच्या प्रवर्तनाचा दिनांक.
११. परिसीमन आदेश अद्ययावत ठेवण्याचा अधिकार.
१२. निरसन.

# परिसीमन अधिनियम, २००२

## (२००२ चा अधिनियम क्रमांक ३३)

(१७ एप्रिल, २००६ रोजी यथाविद्यमान)

[३ जून, २००२]

**लोकसभेतील जागांचे राज्यांमध्ये वाटप, प्रत्येक राज्याच्या विधानसभेतील जागांची एकूण संख्या, प्रत्येक राज्याची आणि विधानसभा असलेल्या प्रत्येक संघ राज्यक्षेत्राची, लोकसभेच्या व राज्याच्या आणि संघ राज्यक्षेत्राच्या विधानसभांच्या निवडणुकींसाठी प्रादेशिक मतदारसंघामध्ये विभागणी यांचे पुनःसमायोजन करण्याकरिता व त्याच्याशी संबंधित बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या त्रेपन्नाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**१.** या अधिनियमास, परिसीमन अधिनियम, २००२ असे म्हणावे. **संक्षिप्त नाव.**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "अनुच्छेद" याचा अर्थ, संविधानाचा अनुच्छेद, असा आहे ;

(ख) "सहयोगी सदस्य" याचा अर्थ, कलम ५ खाली नामनिर्देशित केलेला सदस्य, असा आहे ;

(ग) "आयोग" याचा अर्थ, कलम ३ खाली घटित केलेला परिसीमन आयोग, असा आहे ;

(घ) "निवडणूक आयोग" याचा अर्थ, अनुच्छेद ३२४ मध्ये निर्दिष्ट केलेला निवडणूक आयोग, असा आहे ;

(ङ) "सदस्य" याचा अर्थ, आयोगाचा सदस्य, असा आहे आणि त्यात, अध्यक्षाचा समावेश आहे ;

(च) "राज्य" यात, विधानसभा असलेल्या संघ राज्यक्षेत्राचा अंतर्भाव होतो, परंतु जम्मू व काश्मीर राज्याचा अंतर्भाव होत नाही.

**३.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर, केंद्र सरकार, परिसीमन आयोग म्हणून ओळखला जाणार एक आयोग घटित करील आणि तो पुढीलप्रमाणे तीन सदस्य मिळून बनलेला असेल :— **परिसीमन आयोगाची घटना.**

(क) सर्वोच्च न्यायालयाची न्यायाधीश आहे किंवा होती अशी केंद्र सरकारकडून नियुक्त करण्यात यावयाची एक व्यक्ती एक सदस्य असेल, जी आयोगाची अध्यक्षदेखील असेल ;

(ख) मुख्य निवडणूक आयुक्त किंवा मुख्य निवडणूक आयुक्ताने नामनिर्देशित केलेला निवडणूक आयुक्त, *पदसिद्ध* :

परंतु, या खंडान्वये, निवडणूक आयुक्ताचे सदस्य म्हणून नामनिर्देशन झाल्यानंतर, अशा सदस्याचे नैमित्तिक रिक्त पद कलम ६ अन्वये भरण्याव्यतिरिक्त या खंडान्वये इतर कोणतेही नामनिर्देशन केले जाणार नाही ; आणि

(ग) संबंधित राज्याचा राज्य निवडणूक आयुक्त, *पदसिद्ध*.

[1][**स्पष्टीकरण.**—खंड (ग) च्या प्रयोजनांसाठी, संबंधित राज्याचा राज्य निवडणूक आयुक्त,—

(एक) याचा, (मेघालय, मिझोराम व नागालँड राज्यांव्यतिरिक्त) एखाद्या राज्याच्या आयोगाच्या कर्तव्यासंबंधात अर्थ, अनुच्छेद २४३ ट च्या खंड (१) अन्वये त्या राज्याच्या राज्यपालाने नियुक्त केलेला राज्य निवडणूक आयुक्त, असा आहे ; आणि

(दोन) याचा, यथास्थिति, मेघालय राज्याच्या आयोगाच्या मिझोराम राज्याच्या किंवा नागालँड राज्याच्या आयोगाच्या कर्तव्यासंबंधांत अर्थ, त्या राज्याच्या राज्यपालाने अशा प्रयोजनांसाठी नामनिर्देशित केलेली व्यक्ती, असा आहे.]

---

१. २००४ चा अधिनियम ३, कलम २ अन्वये मूळ स्पष्टीकरणाऐवजी नवीन स्पष्टीकरण दाखल केले (३१ ऑक्टोबर, २००३ रोजी व तेव्हापासून).

आयोगाची कर्तव्ये.

४. (१) परिसीमन अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७६) याच्या कलम ३ अन्वये घटित केलेल्या परिसीमन आयोगाने, सन १९७१ मध्ये झालेल्या जनगणनेवरून निश्चित केलेल्या जणगणनेच्या आकडेवारीच्या आधाराबर, निरनिराळया राज्यांना केलेल्या लोकसभेतील जागांचे वाटप आणि प्रत्येक राज्यातील विधानसभेच्या जागांची एकूण संख्या यांचे केलेले पुनःसमायोजन हे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आयोगाने केलेले पुनःसमायोजन आहे, असे मानण्यात येईल.

(२) पोटकलम (१) च्या तरतुदी आणि त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या अधीनतेने, सन [१][२००१] मध्ये झालेल्या जनगणनेवरून निश्चित केलेल्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारावर लोकसभेच्या आणि राज्य विधानसभेच्या निवडणुकांच्या प्रयोजनासाठी, आयोग, प्रत्येक राज्याची प्रादेशिक मतदारसंघातील विभागणी पुनःसमायोजित करील :

परंतु, अशाप्रकारे पुनःसमायोजन केल्यावर, एखाद्या राज्याला जेथे लोकसभेत एकच जागा दिली असेल तेथे त्या राज्यातून लोकसभेच्या निवडणुकांसाठी त्या संपूर्ण राज्याचा एकच प्रादेशिक मतदारसंघ बनवला जाईल.

सहयोगी सदस्य.

५. (१) आयोगाला प्रत्येक राज्याच्या बाबतीतील त्याच्या कामात मदत करण्याकरिता, आयोग स्वतः दहा सदस्यांना सहयोगी सदस्य करून घेईल. त्यांपैकी पाच सदस्य हे त्या राज्याचे प्रतिनिधित्व करणारे लोकसभेचे सदस्य असतील आणि पाच सदस्य त्या राज्याच्या विधानसभेचे सदस्य असतील :

परंतु, जेथे कोणत्याही राज्याचे प्रतिनिधित्व करणारे लोकसभेचे सदस्य पाच किंवा त्यापेक्षा कमी असतील तेथे असे सर्व सदस्य त्या राज्याचे सहयोगी सदस्य असतील आणि नंतरच्या बाबतीत, त्या राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकसभेच्या सदस्यांची संख्या जेवढ्या संख्येने पाचपेक्षा कमी असेल, तेवढ्या संख्येने, विधानसभेच्या सहयोगी सदस्यांची संख्या दहापेक्षा कमी असेल.

(२) प्रत्येक राज्यात याप्रकारे सहयोगी सदस्य करण्यात येणाऱ्या व्यक्ती, लोकसभा किंवा, यथास्थिति, विधानसभा यांची रचना लक्षात घेऊन, लोकसभा सदस्यांच्या बाबतीत, त्या सभागृहाच्या अध्यक्षाकडून आणि विधानसभेच्या सदस्यांच्या बाबतीत विधानसभेच्या अध्यक्षाकडून, नामनिर्देशित करण्यात येतील.

(३) पोटकलम (२) अन्वये करण्यात येणारे पहिले नामनिर्देशन हे,—

(क) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, निरनिराळ्या विधानसभांच्या अध्यक्षांकडून एक महिन्याच्या आत, आणि लोकसभेच्या अध्यक्षांकडून दोन महिन्यांच्या आत, करण्यात येईल ; आणि

(ख) मुख्य निवडणूक आयुक्तास कळविण्यात येईल, आणि जेव्हा नामनिर्देशन विधानसभेच्या अध्यक्षांकडून करण्यात आले असेल त्याबाबतीत, लोकसभेच्या अध्यक्षांनादेखील कळविण्यात येईल.

(४) सहयोगी सदस्यांपैकी कोणत्याही सदस्यास, आयोगाच्या कोणत्याही निर्णयावर मतदान करण्याचा किंवा स्वाक्षरी करण्याचा अधिकार असणार नाही.

(५) आयोगास, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तींकडून मिळणाऱ्या सहाय्याशिवाय आणखी सहाय्य मिळण्यासाठी, आयोगाला ज्यांचा अनुभव व ज्ञान आवश्यक वाटते अशा,—

(क) भारताचे महानिबंधक व जनगणना आयुक्त किंवा त्यांची नामनिर्देशित व्यक्ती ; किंवा

(ख) भारताचे महासर्वेक्षक किंवा त्यांची नामनिर्देशित व्यक्ती ; किंवा

(ग) केंद्र सरकारचा किंवा राज्य शासनाचा अन्य कोणताही अधिकारी ; किंवा

(घ) भौगोलिक माहिती यंत्रणेमधील कोणतीही तज्ज्ञ व्यक्ती ; किंवा

(ङ) अन्य कोणतीही व्यक्ती,

यांना पाचारण करण्याचा अधिकार असेल, आणि अशाप्रकारे पाचारण करण्यात आलेले अधिकारी व व्यक्ती ह्या आयोगास सहाय्य करण्यास कर्तव्यबद्ध असतील.

---

१. २००४ चा अधिनियम ३, कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (३१ ऑक्टोबर, २००३ रोजी व तेव्हापासून.)

(६) निवडणूक आयोगाचा सचिव हा, आयोगाचा पदसिद्ध सचिव असेल आणि तो, आयोगाच्या अध्यक्षाच्या पर्यवेक्षणाखाली, निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने आपली कार्ये पार पाडील.

**नैमित्तिक रिक्त पदे.**

६. जर अध्यक्षाचे किंवा एखाद्या सदस्याचे किंवा एखाद्या सहयोगी सदस्याचे पद, त्यांच्या मृत्युमुळे किंवा त्यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झाले असेल तर, ते, कलम ३ च्या किंवा, यथास्थिति, कलम ५ च्या तरतुदींन्वये किंवा तरतुदींनुसार, केंद्र सरकारकडून किंवा संबंधित अध्यक्षाकडून, शक्य तितक्या लवकर, भरण्यात येईल.

**आयोगाची कार्यपद्धती व अधिकार.**

७. (१) आयोग, आपली स्वत:ची कार्यपद्धती निश्चित करील आणि त्याला आपली कामे पार पाडताना, एखाद्या दाव्याची न्यायचौकशी करतेवेळी पुढील बाबींच्या संबंधात दिवाणी न्यायालयास, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) यान्वये जे अधिकार असतील, ते सर्व अधिकार असतील :—

(क) साक्षीदारांना समन्स काढणे व त्यांना उपस्थित राहण्यास भाग पाडणे ;

(ख) कोणताही दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे ; आणि

(ग) कोणत्याही न्यायालयामधून किंवा कार्यालयामधून कोणत्याही सरकारी अभिलेखाची मागणी करणे.

(२) आयोगाच्या विचाराधीन असलेल्या कोणत्याही बाबींसाठी, आयोगाच्या मते, उपयुक्त असू शकेल किंवा तिच्यांशी संबंधित असू शकेल अशा मुद्यांवरील किंवा बाबींवरील कोणतीही माहिती सादर करण्यासाठी, कोणत्याही व्यक्तीला भाग पाडण्याचा आयोगाला अधिकार असेल.

(३) आयोगाला, पोटकलम (१) च्या खंड (क) ते (ग) व पोटकलम (२) द्वारे त्यास प्रदान केलेल्या अधिकारांपैकी कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यासाठी आपल्या कोणत्याही सदस्यास प्राधिकृत करता येईल, आणि त्याबाबतीत आयोगाने प्राधिकृत केलेल्या सदस्याने, यांपैकी कोणत्याही अधिकारांचा वापर करून दिलेल्या कोणताही आदेश किंवा केलेली कोणतीही कृती ही, आयोगाचा आदेश किंवा यथास्थिति, कृती असल्याचे मानण्यात येईल.

(४) जर सदस्यांमध्ये मतभेद निर्माण झाला असेल तर, बहुमताने घेतलेला निर्णय प्रभावी ठरेल आणि आयोगाची कृती किंवा आदेश, बहुमताने घेतलेल्या दृष्टिकोनाच्या स्वरूपात अभिव्यक्त होतील.

(५) आयोगाला तसेच सहयोगी सदस्यांच्या कोणत्याही गटाला, एखादा सदस्य किंवा सहयोगी सदस्य तात्पुरता अनुपस्थित असला तरीही किंवा आयोगामध्ये किंवा सहयोगी सदस्यांच्या अन्य कोणत्याही गटामध्ये एखादे पद रिक्त असेल तरीही, कृती करण्याचा अधिकार असेल, आणि केवळ अशा तात्पुरत्या अनुपस्थितीच्या किंवा अशी रिक्त पदे असल्याच्या कारणावरून, आयोगाची किंवा सहयोगी सदस्यांच्या कोणत्याही गटाची कृती किंवा कार्यपद्धती विधिअग्राह्य ठरणार नाही किंवा प्रश्नास्पद केली जाणार नाही.

(६) आयोग हा, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) याची कलमे ३४५ व ३४६ च्या प्रयोजनार्थ, दिवाणी न्यायालय असल्याचे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण.—** साक्षीदारांना उपस्थित राहण्यास भाग पाडण्याच्या प्रयोजनार्थ, आयोगाच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमा ह्या भारताच्या भूप्रदेशाच्या सीमा असतील.

**जागांच्या संख्येचे पुन:समायोजन.**

८. अनुच्छेद ८१, १७०, ३३० व ३३२ आणि तसेच दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्र वगळता अन्य संघ राज्यक्षेत्रांच्या संबंधात संघ राज्यक्षेत्र शासन अधिनियम, १९६३ (१९६३ चा २०) ची कलमे ३ व ३९ आणि दिल्ली राष्ट्रीय राजधानी राज्यक्षेत्राच्या संबंधात अनुच्छेद २३९ कक च्या खंड (२) चा उप खंड (ख) विचारात घेऊन, आयोग, आदेशाद्वारे,—

(क) प्रत्येक राज्याला वाटप करावयाच्या लोकसभेतील जागांची संख्या सन १९७१ मध्ये घेण्यात आलेल्या जनगणना आकडेवारीच्या आधारे व कलम ४ च्या तरतुदींस अधीन राहून निश्चित करील आणि राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरिता, काही असल्यास, राखून ठेवावयाच्या जागांची संख्या, सन [१][२००१] मध्ये घेण्यात आलेल्या जनगणनेत निश्चित केलेल्या जनगणना आकडेवारीच्या आधारे निश्चित करील ; आणि

---

१. २००४ चा अधिनियम ३, कलम ४ (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (३१ ऑक्टोबर, २००३ रोजी व तेव्हापासून).

(ख) प्रत्येक राज्याच्या विधानसभेला नेमून द्यावयाच्या जागांची एकूण संख्या, सन १९७१ मध्ये घेण्यात आलेल्या जनगणनेत निश्चित केलेल्या जनगणना आकडेवारीच्या आधारे कलम ४ च्या तरतुदींना अधीन राहून, निश्चित करील आणि राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरिता, काही असल्यास राखून ठेवावयाच्या जागांची संख्या, सन [1][२००१] मध्ये घेण्यात आलेल्या जनगणनेत निश्चित केलेल्या जनगणना आकडेवारीच्या आधारे निश्चित करील :

परंतु, खंड (ख) अन्वये कोणत्याही राज्याच्या विधानसभेला नेमून दिलेल्या जागांची एकूण संख्या ही, खंड (क) अन्वये त्या राज्यास वाटप केलेल्या लोकसभेतील जागांच्या संख्येच्या पूर्णांक पटीत असेल.

**मतदारसंघाचे परिसीमन.**

९. (१) आयोग, त्यानंतर यात तरतूद केलेल्या रीतीने, १९७१ च्या जनगणनेच्या आधारे पुन:समायोजन केल्याप्रमाणे प्रत्येक राज्यास वाटप केलेल्या लोकसभेतील जागा व प्रत्येक राज्याच्या विधानसभेत नेमून दिलेल्या जागा, एक सदस्यीय प्रादेशिक मतदारसंघामध्ये वितरित करील, आणि संविधानाच्या तरतुदी, कलम ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अधिनियमाच्या तरतुदी व पुढील तरतुदी विचारात घेऊन, सन [2][२००१] मध्ये घेण्यात आलेल्या जनगणनेत निश्चित केलेल्या जनगणना आकडेवारीच्या आधारे त्यांचे परिसीमन करील :—

(क) सर्व मतदारसंघ, व्यवहार्य असेल तेथवर, भौगोलिकदृष्ट्या सलग क्षेत्रे असतील आणि त्यांचे परिसीमन करताना, भौतिक वैशिष्ट्ये, प्रशासनिक युनिटांच्या विद्यमान सीमा, दळणवळणाच्या सोयी व जनतेसाठी सुविधा या गोष्टी विचारात घेण्यात येतील ;

(ख) प्रत्येक विधानसभा मतदारसंघाचे सीमांकन अशाप्रकारे करण्यात येईल की, त्याचा एका संसदीय मतदारसंघामध्ये संपूर्णपणे समावेश होईल;

(ग) ज्या मतदारसंघात अनुसूचित जातींकरिता जागा राखून ठेवलेल्या आहेत ते मतदारसंघ राज्याच्या निरनिराळ्या भागात, वितरित करण्यात येतील आणि शक्य असेल तेथवर, ज्या क्षेत्रांत त्यांच्या लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असलेले गुणोत्तर प्रमाण तौलनिकदृष्ट्या जास्त आहे, त्या क्षेत्रांत ते मतदारसंघ ठेवण्यात येतील ; आणि

(घ) ज्या मतदारसंघात अनुसूचित जमातींकरिता जागा राखून ठेवल्या आहेत ते मतदारसंघ, शक्य असेल तेथवर, ज्या क्षेत्रांत त्यांच्या लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी असलेले गुणोत्तर प्रमाण जास्त आहे, त्या क्षेत्रांत ठेवण्यात येतील.

(२) आयोग,—

(क) मतदारसंघांच्या परिसीमनाबाबतच्या आपल्या प्रस्तावाबरोबरच, ज्या कोणत्याही सहयोगी सदस्याला आपल्या भिन्न मताचा प्रस्ताव भारताच्या **राजपत्रात** व संबंधित सर्व राज्यांच्या **राजपत्रात** आणि तसेच त्याला योग्य वाटेल अशा अन्य रीतीने प्रसिद्ध करण्याची इच्छा असेल त्याचा भिन्न मताचा प्रस्ताव, कोणताही असल्यास, प्रसिद्ध करील ;

(ख) ज्या दिनांकाला किंवा ज्या दिनांकानंतर प्रस्तावावर तो आणखी विचार करील असा एखादा दिनांक विनिर्दिष्ट करील ;

(ग) अशाप्रकारे विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकाच्या आधी जे आले असतील असे सर्व आक्षेप व सूचना यावर विचार करील, आणि अशाप्रकारे विचारात घेण्याच्या प्रयोजनाकरिता, प्रत्येक राज्यात, जेथे त्याला योग्य वाटेल तेथे एका किंवा अनेक ठिकाणी एक किंवा अधिक सार्वजनिक बैठका घेईल ; आणि

(घ) त्यानंतर एका किंवा अधिक आदेशांन्वये प्रत्येक राज्याच्या—

(एक) संसदीय मतदारसंघांचे परिसीमन ; व

(दोन) विधानसभा मतदारसंघांचे परिसीमन,

निश्चित करील.

---

१. २००४ चा अधिनियम ३, कलम ४ (दोन) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (३१ ऑक्टोबर, २००३ रोजी व तेव्हापासून).
२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (३१ ऑक्टोबर, २००३ रोजी व तेव्हापासून).

**आदेश प्रसिद्ध करणे आणि त्यांच्या प्रवर्तनाचा दिनांक.**

**१०.** (१) आयोग, कलम ८ किंवा कलम ९ अन्वये तयार केलेल्या आपल्या आदेशांपैकी प्रत्येक आदेश भारताच्या **राजपत्रात** आणि संबंधित राज्यांच्या **राजपत्रात** प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील आणि असे आदेश किमान दोन प्रादेशिक वर्तमानपत्रांतून एकाच वेळी प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील आणि जनतेसाठी रेडिओ, दूरदर्शन व इतर शक्य असलेल्या माध्यमांद्वारे प्रसिद्धी देईल आणि संबंधित राज्याच्या **राजपत्रातील** अशा प्रसिद्धीनंतर, प्रत्येक जिल्हा निवडणूक अधिकारी, त्याच्या अधिकारितेतील क्षेत्रासंबंधीच्या अशा आदेशाच्या **राजपत्राची** आवृत्ती लोकांच्या माहितीसाठी त्याच्या कार्यालयात ठळकपणे दिसेल अशा ठिकाणी लावण्याची व्यवस्था करील.

(२) असा प्रत्येक आदेश, भारताच्या **राजपत्रात** तो प्रसिद्ध केल्यावर त्याला कायद्याचे वजन प्राप्त होईल आणि तो कोणत्याही न्यायालयात प्रश्नास्पद करण्यात येणार नाही.

(३) असा प्रत्येक आदेश, अशाप्रकारे प्रसिद्ध झाल्यावर, शक्य तितक्या लवकर, लोकसभेत आणि संबंधित राज्यांच्या विधानसभेत मांडण्यात येईल.

(४) पोटकलम (५) च्या तरतुदींना अधीन राहून, लोकसभेच्या किंवा राज्याच्या विधानसभेच्या निरनिराळ्या प्रादेशिक मतदारसंघातील प्रतिनिधित्वाचे पुन:समायोजन आणि अशा कोणत्याही आदेशात तरतूद केलेल्या मतदारसंघाचे परिसीमन, तो आदेश, भारताच्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यानंतर, यथास्थिति, लोकसभेच्या किंवा विधानसभेच्या घेण्यात येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीच्या संबंधात लागू होईल आणि या अधिनियमाच्या तरतुदींशी असे प्रतिनिधित्व किंवा परिसीमन जेथवर असेल तेथवर, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यामध्ये किंवा अशा कायद्याअन्वये जारी केलेला कोणताही आदेश किंवा अधिसूचना यात अंतर्भूत असलेल्या प्रतिनिधित्व आणि परिसीमन या संबंधीच्या तरतुदींचे अधिक्रमण करून, ते लागू होईल.

(५) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे लोकसभेतील किंवा एखाद्या राज्याच्या विधानसभेतील प्रतिनिधित्वावर, यथास्थिति, त्या राज्याच्या लोकसभा मतदारसंघाच्या किंवा विधानसभा मतदारसंघाच्या परिसीमनासंबंधातील आयोगाचे एक वा अनेक अंतिम आदेश, भारताच्या **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास अस्तित्वात असलेली लोकसभा किंवा विधानसभा विसर्जित होईपर्यंत कोणताही परिणाम होणार नाही आणि अशा लोकसभेतील वा अशा कोणत्याही विधानसभेतील कोणतीही रिक्त जागा भरण्यासाठी घेण्यात योणारी पोटनिवडणूक, पोटकलम (४) अन्वये अधिक्रामित केलेल्या कायद्याच्या व आदेशांच्या तरतुदींच्या आधारे, जणू काही उक्त तरतुदी अधिक्रामित करण्यात आल्या नव्हत्या असे समजून घेण्यात येईल.

(६) आयोग, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेला त्याचा प्रत्येक आदेश त्या पोटकलमात तरतूद केलेल्या रीतीने व कलम ३ अन्वये आयोग घटित झाल्यापासून दोन वर्षांच्या आत पूर्ण करण्याची आणि प्रसिद्ध करण्याची शिकस्त करील.

**परिसीमन आदेश अद्ययावत ठेवण्याचा अधिकार.**

**११.** (१) निवडणूक आयोगास भारताच्या **राजपत्रातील** आणि संबंधित राज्यातील **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी,—

(क) कलम ९ अन्वये आयोगाने काढलेल्या कोणत्याही आदेशातील कोणताही मुद्रणदोष अथवा अनवधानाने झालेली चूक किंवा वगळणूक यामुळे उद्भवलेला दोष दुरुस्त करता येईल ; आणि

(ख) जेव्हा उक्त आदेशात नमूद केलेल्या एखाद्या जिल्ह्याचे किंवा प्रादेशिक विभागाचे नाव अथवा सीमा बदलण्यात आली असेल किंवा आल्या असतील तेव्हा, तो आदेश अद्ययावत करण्यासाठी त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटत असतील अशा सुधारणा करता येतील, तथापि, कोणत्याही अशा अधिसूचनेद्वारे कोणत्याही मतदारसंघाच्या सीमा किंवा क्षेत्र किंवा विस्तार यात बदल केला जाणार नाही.

(२) या कलमाअन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, लोकसभेसमोर व संबंधित राज्याच्या विधानसभेसमोर मांडण्यात येईल.

**निरसन.**

**१२.** परिसीमन अधिनियम, १९७२ (१९७२ चा ७६) याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

## THE DELIMITATION ACT, 2002

## परिसीमन अधिनियम, २००२

इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| article | अनुच्छेद | [S.2 (a)] |
| associate member | सहयोगी सदस्य | [S.2 (b)] |
| comparatively | तौलनिकदृष्ट्या | [S.9(1)(c)] |
| delimitation | सीमांकन | [S.9(1)(b)] |
| dissenting proposal | भिन्न मताचा प्रस्ताव | [S.9(2)(a)] |
| dissolution | विसर्जन | [S.10(5)] |
| endeavour | शिकस्त | [S.10(6)] |
| nomination | नामनिर्देशन | [S.5(3)] |
| proportion | गुणोत्तर प्रमाण | [S.9(1)(d)] |
| readjustment | पुनःसमायोजन | [preamble] |
| superseded | अधिक्रामित | [S.10(5)] |
| supersession | अधिक्रमण | [S.10(4)] |
| to call upon | पाचारण | [S.5(5)(e)] |
| trial | न्यायचौकशी | [S.7(1)] |

# परिसीमन अधिनियम, २००२

# THE DELIMITATION ACT, 2002

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अधिक्रमण | supersession | [क.१०(४)] |
| अधिक्रामित | superseded | [क.१०(५)] |
| अनुच्छेद | article | [क.२(क)] |
| गुणोत्तर प्रमाण | proportion | [क.९(१)(घ)] |
| तौलनिकदृष्ट्या | comparatively | [क.९(१)(ग)] |
| नामनिर्देशन | nomination | [क.५(३)] |
| न्यायचौकशी | trial | [क.७(१)] |
| पाचारण | to call upon | [क.५(५)(ङ)] |
| पुनःसमायोजन | readjustment | [उद्देशिका] |
| भिन्न मताचा प्रस्ताव | dissenting proposal | [क.९(२)(क)] |
| विसर्जन | dissolution | [क.१०(५)] |
| शिकस्त | endeavour | [क.१०(६)] |
| सहयोगी सदस्य | associate member | [क.२(ख)] |
| सीमांकन | delimitation | [क.९(१)(ख)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई